पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक २९/०९/२०१७

# मौजा कल्लेड गावातील लोकांनी केली शस्त्रे जमा

दिनांक २६/०९/२०१७ रोजी उपपोस्टे झिंगानुर हद्दितील नक्षलदृष्टया अतिसंवेदनशील मौजा कल्लेड गावात मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, सिरोंचा श्री. गजानन राठोड यांचे उपस्थितीत ग्रामभेटीदरम्यान कल्लेड गावातील काही नागरिकांनी स्वयंस्फुर्तपणे आपल्याजवळील भरमार पोलीसांकडे जमा करुन नक्षलवादयांचा धिक्कार केला.

सदर भेटीदरम्यान ग्रामस्थांनी त्यांना नक्षलवादंयापासून होणाऱ्या त्रासाला वाचा फोडली. नक्षलवादयांनी आजवर दिलेल्या त्रासाला कंटाळून सदर ग्रामस्थांनी एकमताने नक्षल गावबंदी योजना आपल्या गावात राबविण्याचा निर्धार केला. गावातील नागरिकांना पोलीसांना सहकार्य करण्याबद्दल आवाहन करण्यात आले. या आवाहानाला नागरिकांनी उत्तर देत शस्त्र न उचलण्याचा निश्चय केला. तसेच गावातील नक्षल पिडीत अर्जुन मडावी यांच्या कुटुंबियांची भेट घेवून त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी सिरोंचा यांच्या हस्ते आर्थिक मदत देण्यात आली.

यावेळी पोउपनि. मानसिंग पाटील, पोउपनि. निलेश चव्हाण, क्यु.आर.टी. सिरोंचा, पोउपनि श्रीकांत जाधव, उपपोस्टे झिंगानुर व पोलीस कर्मचारी तसेच कल्लेड गावातील नागरिक उपस्थित होते.

